# महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालय सेवांचे संगणकीकरण :

सन्माननीय सदस्यांना गुणात्मक व शीघ्रगतीने सेवा देता यावी यासाठी इंटरनेटसेवा तसेच उपलब्ध सर्व वाचन साहित्याचा व ग्रंथालयाच्या विद्यमान उपलब्ध जागेचा जास्तीत जास्त उपयोग करता यावा यासाठी विधानमंडळ ग्रंथालय सेवांचे संगणकीकरण करणे क्रमप्राप्त होते. त्या दृष्टीने विधानमंडळाच्या ग्रंथालयीन सेवांसाठी चार आज्ञावल्या विकसीत केल्या आहेत. तसेच ग्रंथालयाच्या दैनंदिन कामकाजासाठी Libsys ही तयार प्रमाण आज्ञावली व्यवस्थापित करण्यात आलेली आहे. या आज्ञावल्या व त्या संदर्भातील डेटाबेसची व सेवांची माहिती पुढील प्रमाणे आहे:-

- **<u>वृत्तपत्रे कात्रणे माहिती पद्धती आज्ञावली-</u>**

  **<u>NCIS(Newspapers Clippings Information System) Software:</u>**

वृत्तपत्रांतील विविध विषयांच्या महत्वाच्या बातम्या, लेख, अग्रलेख इत्यादीद्वारे द्यावयाच्या संदर्भसेवांचे संगणकीय नियंत्रण करता यावे यासाठी सदर आज्ञावली विकसित करण्यात आली आहे.

या आज्ञावलीत विविध महत्वाच्या विषयांवरील सुमारे 1,03,000 कात्रणे स्कॅनिंग करुन या माहितीचा डेटाबेस तयार करण्यात आला आहे.

- **<u>सदस्यांची वैयक्तिक माहिती पद्धती आज्ञावली :</u>**

  **<u>MIS (Members Information System) Software:</u>**

विधानमंडळाच्या विद्यमान तसेच माजी सन्माननीय सदस्यांच्या वैयक्तिक परिचयाच्या माहितीचे संगणकीय नियंत्रण करता यावे यासाठी ही आज्ञावली विकसित करण्यात आली आहे.

या आज्ञावली अंतर्गत विधानसभा व विधानपरिषदेसह सन 1937 ते 2009 पर्यन्तच्या कालावधीतील सर्व सन्माननीय सदस्यांच्या जीवन परिचयाच्या नोंदी उपलब्ध माहितीच्या आधारे घेण्यात आलेल्या आहेत.

- **<u>कार्यवाहीवृत्ते माहिती पद्धती आज्ञावली :</u>**

  **<u>DIS ( Debates Information System) Software:</u>**

विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या कार्यवाहीवृत्तांची अनुक्रमणिका (Index) व संबंधित कार्यवाहीवृत्तांची पृष्ठे व त्याद्वारे देण्यात यावयाच्या संदर्भसेवांचे संगणकीय नियंत्रण करता यावे यासाठी ही आज्ञावली विकसित करण्यात आली आहे.

या आज्ञावलीत सन 2000 पासून मागे 1980 पर्यन्तच्या विधानसभा व विधान परिषदेच्या कार्यवाहीवृत्तांच्या उपलब्ध अनुक्रमणिकांचा डेटाबेस व संबंधीत प्रोसिडींग्जच्या पृष्ठांचे स्कॅनिंग करुन सर्व माहितीचा डेटाबेस तयार करण्यात आलेला आहे.

- **<u>विधेयक अधिनियम माहिती पद्धती आज्ञावली :</u>**

  **<u>AMS (Acts Management System) Software</u>** :

महाराष्ट्र विधिमंडळात मांडण्यात आलेली, चर्चा झालेली व संमत / असंमत करण्यात आलेली शासकीय/अशासकीय विधेयके, अधिनियम व अधिनियमांना सुचविलेल्या सुधारणा या सर्वांबाबत सभागृहात झालेल्या चर्चा, एखाद्या विधेयकाचा वा अधिनियमाचा पूर्वेतिहास व सद्यस्थिती इत्यादींची माहिती नोंद करता यावी व त्याद्वारे द्याव्या लागणा-या संदर्भसेवांचे संगणकीय नियंत्रण करता यावे यासाठी ही आज्ञावली विकसित करण्यात आलेली आहे.

सदर आज्ञावली अंतिम स्वरुपात अद्याप विकसित करण्याचे काम पुर्ण झालेले नाही.

- **<u>पुस्तके व नियतकालिके माहिती पद्धती आज्ञावली</u>**

  **<u>Libsys Software :</u>**

ग्रंथालयातील नित्याची कामे उदाहरणार्थ पुस्तके व नियतकालिके पंसती तत्वावर घेणे, खरेदी केलेल्या पुस्तकांवर तांत्रिक सोपस्कार करणे व त्यांची देव-घेव इत्यादी करण्यासाठी व त्याद्वारे माहिती देण्यासाठी तसेच, पुस्तकांतील व नियतकालिकांतील लेखांचा विषय, लेखक, शिर्षक, शिर्षकातील महत्वाचे शब्द, आवृत्ती, प्रकाशक, प्रकाशन वर्ष व महिना, वर्गांक, (विषय क्रमांक + लेखकाचे नाव) पृष्ठे इत्यादींची माहिती या आज्ञावलीद्वारे नोंद करण्यात येऊन डेटाबेस उभारला जातो व या डेटाबेसद्वारे नोंद केलेले प्रत्येक पुस्तक व लेख व त्या अंतर्गत विषय वा अन्य विविध बाबींच्या उपलब्धतेची माहिती प्राप्त होऊ शकते.

या आज्ञावलीद्वारे सुमारे 51,000 पुस्तकांच्या तसेच, सुमारे 11,000 नियतकालिकांतील लेखांच्या नोंदी करण्यात आलेल्या आहेत.